# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक:- रानिआ/मनपा-२०२५/आचारसंहिता/८१/१२४/का.५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ३०/१२/२०२५

प्रति,
१) मा.आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका
२) मा.आयुक्त, मुंबई पोलीस

विषय -: स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुक-२०२५(आचारसंहिता)
स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांसंदर्भात लागू करण्यात आलेल्या आदर्श आचारसंहिता कालावधीमध्ये मुंबईतील जियो वर्ल्ड कन्व्हेनशन सेंटर आणि बॉम्बे एक्जिबिशन सेंटर, मुंबई येथे आयोजित केलेल्या "IIJS BHARAT Signature 2026" & "IGJME Bharat Signature Mumbai-2026" या जागतिक दर्जाच्या प्रदर्शनाकरिता मौल्यवान जडजवाहीर वस्तुंच्या वाहतुकीस परवानगी मिळणेबाबत.

संदर्भ -: १) राज्य निवडणूक आयोगाचे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या आदर्श आचारसंहितेबाबत दि.०४.११.२०२५ रोजी निर्गमित केलेले एकत्रित आदेश.
२) राज्यातील २९ म.न.पा.च्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी दि.१५.१२.२०२५ रोजी जाहीर केलेला निवडणूक कार्यक्रम (क्र.रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.८०/का-६).
३) उपसंचालक, वाणिज्य व उद्योग मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र File No.K-35011/12/2022/EP(G&J), dtd.01.10.2025
४) सभ्यसाची रे यांचा दि.३०.१२.२०२५ रोजी राज्य निवडणूक आयोगास लिहिलेले ई-मेल.

महोदय / महोदया,

वरील विषयाच्या अनुषंगाने कार्यकारी संचालक सभ्यसाची रे यांच्या सोबत जोडलेल्या उक्त संदर्भ क्र.४ च्या पत्राचे अवलोकन व्हावे. सदर पत्रामध्ये मुंबईतील जियो वर्ल्ड कन्व्हेनशन सेंटर आणि बॉम्बे एक्जिबिशन सेंटर, मुंबई येथे "IIJS BHARAT Signature 2026" & "IGJME Bharat Signature Mumbai-2026" या अनुक्रमे दि.८ ते ११ जानेवारी, २०२६ व दि.९ ते १२ जानेवारी, २०२६ या कालावधीत आयोजित केलेल्या जागतिक दर्जाच्या प्रदर्शनाकरिता मौल्यवान जडजवाहीर वस्तुंच्या वाहतुकीस परवानगी मिळण्याबाबत राज्य निवडणूक आयोगास विनंती केली आहे.

सबब, सदर प्रकरणी जडजवाहिर यांची प्रदर्शन ठिकाणी व प्रदर्शन ठिकाणांहून परत वाहतूक करताना, त्याच्या व्यवहारासंदर्भात योग्य ती कागदपत्रे, उदा. सदर दोन प्रदर्शनांमध्ये सहभागी होत असल्याबाबतचे Gem & Jewellery Export Promotion Council यांचे पत्र, GST Invoice as per CGST Rule 55 of 2017, वस्तुच्या मालकाचे नाव असलेले अधिकारपत्र, डिलिव्हरी चलान, CGST Rules 2017, Stock Summary ची प्रमाणित प्रत, वस्तुच्या वाहनांच्या वाहकांचे फोटो, ओळखपत्र इत्यादी आवश्यक कागदपत्रे, सदर संस्थेच्या सभासदांमार्फत दाग-दागिन्यांच्या वाहतुकीच्या तपासणीदरम्यान सादर करण्यात आल्यास, महानगरपालिकेच्या स्तरावर निर्माण करण्यात येणाऱ्या भरारी पथकाद्वारे कोणत्या दस्तऐवजांची तपासणी करणे आवश्यक आहे, त्या बाबी आपणाकडून भरारी पथकांच्या निदर्शनास आणून देण्यात याव्यात, जेणेकरुन जडजवाहिरांची ने-आण करणे सुरळीत होईल.

आदेशानुसार,

आपला,

(के.सुर्यकृष्णमूर्ती)
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

सोबत:- वरील संदर्भिय पत्र.

D:\Code of Conduct-०६.११.२०२५\Achar Sahita\आचारसंहिता पत्रव्यवहार-०६.११.२०२५ पासून- New File.docx